हिंदुस्थान
वलयांकित
बुधवार, दि. २१ मार्च २०१८

'हिचकी' आ गई!





चित्रपट श्रीदेवीच्या आयुष्यावर....

कोण आहे संजना सांघी?

समाधानकारक "रेड"

अशी केली खादाडी

फॅमिली टाईज विथ कपिल शर्मा

जगावेगळी अंतयात्रा

हिंदुस्थान वलयांकित

भेट म्हणून गुंतवणूक योजना!

नव्याने लागू करण्यात आलेल्या एलटीसीजी(लाँग टर्म कॅपिटल गेन) कराच्या बाबतीत आपल्या नफ्यातून १० टक्के कर भरण्याबाबत एवढं वाईट का वाटावं असा विचार अनेक करदाते करतात. कारण त्या बहुतेकांच्या पोर्टफोलिओतील गुंतवणूक फार मोठी नसते. मात्र ज्यांचा पोर्टफोलिओ बराच मोठा म्हणजे इक्विटी फंडामध्ये १५ लाख आणि मासिक २५,००० रुपयांचे एसआयपी असा असेल त्यांना हा कर कसा वाचवावा याची नक्कीच चिंता वाटेल. कारण काही वर्षांनी गुंतवणूक काढून घेतल्यावर त्यांना नक्कीच कर भरावा लागेल. या परिस्थितीत १८ वर्षांवरील मुलाला बक्षीस किंवा भेट म्हणून पैसा देऊन नंतर तो गुंतवणं हा अगदी परिपूर्ण कायदेशीर मार्ग आहे. तुम्ही मुलाला किंवा मुलीला कितीही रक्कम भेट म्हणून देऊ शकता आणि त्यावर कर लागू होत नाही. हाच पैसा पुन्हा गुंतवून नफाही मिळवू शकता. करविषयक नियमानुसार अठरा वर्षानंतरचं मूल हे स्वतंत्र व्यक्ती बनतं. त्यामुळे त्याची कमाई पालकांच्या उत्पन्नात धरली जात नाही. पालकांनी मुलाच्या नावावर काही पैसे गुंतवले तर त्यासाठी एक लाखापर्यंतचा करमुक्त नफा मिळणार आहेच. शिवाय अडीच लाख रुपयांची मूलभूत करमाफी आणि सेक्शन ८० सी अंतर्गत दीड लाख रुपयांची करकपातही लागू होणार आहे. त्यामुळे पुढे अनेक वर्षं त्याच्या उत्पन्नावर कर लागू होणार नाही.

स्टॉक्सची वरचेवर विक्री करत राहण्यानंही अधिक नफा मिळू शकतो. एखादा स्टॉक दीर्घकाळापर्यंत ठेवण्याची आपली इच्छा असली तरी पोर्टफोलिओ सतत हलता ठेवणं महत्त्वाचं ठरतं. दीर्घकालीन भांडवली लाभ मिळवण्यासाठी स्टॉक्सची विक्री करा आणि नंतर पुन्हा तेच स्टॉक्स खरेदी करा. यामुळे स्टॉकच्या किमती घसरल्या तर अल्पकालीन किंवा दीर्घकालीन तोटा झाल्याचं स्पष्ट करू शकता. समजा, फेब्रुवारी २०१८ मध्ये १५० रुपये प्रति शेअर या दरानं एखाद्या कंपनीचे १००० शेअर खरेदी केले आणि हा शेअर मार्च २०१९ पर्यंत २२० रुपयांपर्यंत चढला तर तुम्ही ७० हजार रुपये एवढा दीर्घकालीन भांडवली लाभ मिळवला. मार्च २०१९ मध्ये तुम्ही सगळे शेअर्स विकले आणि पुन्हा लगेच खरेदी केले तर शेअरच्या खरेदीची किंमत १५० रुपये नव्हे; तर २२० रुपये असेल. शेअर्स विकत घेतल्याची तारीखही मार्च २०१९ असेल. हा शेअर पुढच्या १२ महिन्यांमध्ये ३०० रुपयांपर्यंत चढला तर झालेला लाभ केवळ ८० हजार रुपये असेल आणि कायद्यानुसार करमुक्त असेल. याउलट तुम्ही शेअर २२० रुपयांपर्यंत चढल्यानंतरही विकले नसते तर तोच शेअर ३०० रुपयांपर्यंत चढल्यानंतर दीड लाख रुपये भांडवली नफा झाल्याचं दिसलं असतं. मग यापैकी एक लाखांचा नफा करमुक्त असल्याने ५०,००० रुपयांवर कर भरावा लागला असता. कर वाचवण्याचा हा एक चांगला मार्ग उपलब्ध आहे. बाजारावर सतत लक्ष ठेवा आणि विक्री आणि लगेच खरेदी हे सूत्र अवलंबून करबचत करा.

आपला लाभ आणि देय कर किती आहे हे कसं मोजावं याविषयी अनेक गुंतवणूकदारांमध्ये संभ्रम असतो. यासाठी पोर्टफोलिओ ट्रॅकरची जरूर मदत घ्यावी. ऑनलाईन पोर्टफोलिओ ट्रॅकरच्या सहाय्याने स्टॉक्स आणि इक्विटी फंडांवरील करपात्र दीर्घकालीन भांडवली नफा मोजता येतो. विशेषतः मोठा फंड पोर्टफोलिओ असलेल्या गुंतवणूकदारांसाठी तो अधिक उपयुक्त ठरतो. अशा प्रकारे किमान कर भरून आपण आपलं गुंतवणुकीचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्या मुलांना किंवा नातवंडांना त्यांच्या नावे एसआयपीज सुरू करूनही भेट देता येते. अर्थातच गुंतवणुकीचे सर्वच पर्याय भेट देण्यायोग्य असतात असं नाही. त्यामुळे आपलं उद्दिष्टं आणि पर्यायाच्या जमेच्या व तोट्याच्या बाजू विचारात घेऊन पर्यायांची निवड करणं रास्त ठरतं. आतापर्यंत मुलांच्या नावे रिकरिंग किंवा मुदत ठेवी ठेवणं हा उत्तम पर्याय मानला जात होता. परंतु, मुलाच्या नावावरील ठेवीपासून मिळणारं उत्पन्न हे पालकांच्या नावावर धरलं जातं. त्यामुळे यात गुंतवणूक केली तर त्याचा करबचतीसाठी उपयोग होणार नाही.

पारंपरिक विमा योजनांमध्ये गुंतवणूक केली तरीही त्यासाठी दर वर्षी हप्ता भरावा लागतो आणि त्याचा परतावा चार ते पाच टक्के मिळतो.

अल्पवयीन मुलांना अगर इतर नातेवाईकांना बक्षीस किंवा भेट म्हणून काही रक्कम दिली तर करबचतीसाठी त्याचा चांगला उपयोग होतो. शिवाय आपल्या प्रिय व्यक्तींच्या भवितव्याची काळजीही दूर होते. वेगवेगळ्या आर्थिक योजना भेट म्हणून देण्याचा फंडा सध्या वापरला जात आहे. नेमक्या कोणत्या प्रकारे हे साध्य करणं शक्य होतं आणि त्यासाठी कोणते पर्याय योग्य ठरतात याविषयी.

अर्थातच विमा हा गुंतवणुकीसाठी नसून सुरक्षिततेसाठी आहे. त्यामुळे त्याचं वेगळं उद्दिष्ट लक्षात घेऊन यात काही प्रमाणात गुंतवणूक करण्यास हरकत नसावी. विशेषतः मुलांच्या भवितव्याचा विचार करता आयुर्विमा चांगला ठरतो. मोठ्या रकमेचा टर्म इन्शुरन्स केला असेल तर कुटुंबाला मोठी मदत होते. याखेरीज आरोग्य विम्यातील गुंतवणूकही उपयुक्त ठरते. तिच्यामुळे करबचतही होते; शिवाय ऐनवेळी रुग्णालयात भरती होण्याची वेळ आली तर व्यक्ती निदान खर्चाच्या चिंतेतून मुक्त असते. शिवाय मुलांसाठीच्या काही योजनांमध्ये पालकाचा मृत्यू झाला तर कंपनी पुढील हप्ते भरते आणि मुलांना पालक हयात असतानाचे सर्व लाभ देते. शिवाय त्याखेरीज मुलांच्या भवितव्यासाठी काही योजनांतर्गत विम्याच्या रकमेच्या १० टक्के वार्षिक रक्कमही दिली जाते. अशा योजनांमुळे मुलांच्या भवितव्याची काळजी बऱ्यापैकी दूर होते.

अर्थसार

पीपीएफ आणि सुकन्या समृद्धी योजनेतील परतावे करमुक्त आहेत आणि सेक्शन ८० सी खाली करबचतीसाठीही या गुंतवणुकी उपयुक्त ठरतात. परंतु ही खाती कोणी उघडावीत आणि त्यात किती गुंतवणूक करावी यावर बंधनं आहेत. फक्त मुलांचे पालक किंवा कायदेशीर गार्डियनच या योजनांतर्गत मुलांची खाती उघडू शकतात. मुलाच्या आणि पालकांच्या पीपीएफ खात्यात मिळून वार्षिक दीड लाखांहून अधिक रक्कम ठेवता येत नाही. सुकन्या समृद्धी योजनेतही अशीच वार्षिक दीड लाखांची मर्यादा आहे. मात्र मुलाला किंवा मुलीला भरपूर रक्कम मिळावी अशी इच्छा असेल तर इक्विटीला पर्याय नाही. दीर्घकाळात इक्विटीमधील गुंतवणूक महागाई आणि कर या दोहोंवर मात करून भरपूर उत्पन्न मिळवून देते. गेल्या पाच वर्षांमध्ये इक्विटी फंडांनी वार्षिक सरासरी १५ टक्क्यांनी परतावा दिला आहे. एसआयपीमधील गुंतवणूकही या दृष्टीनं महत्त्वाची ठरते. अगदी १२ टक्के एवढाच परतावा मिळाला असं गृहीत धरलं तरीही इक्विटी फंडांमध्ये मासिक ५००० रुपयांची एसआयपी गुंतवणूक १५ वर्षांनी सुमारे २३ लाख ८० हजार रुपयांची गुंतवणूक जमा करते. पीपीएफमध्ये एवढीच रक्कम गुंतवली तर १५ वर्षांनी १६ लाख ४३ हजार रुपये मिळतील. बँकांमधील गुंतवणूक सध्या जेमतेम सहा ते सात टक्क्यांनी व्याज देत असल्यामुळे महागाईवाढीचा आणि करांचा विचार करता ही गुंतवणूक तोट्याचीच ठरते.

मुलांच्या किंवा ज्या कोणाच्या नावे शेअर्स करायचे असतील त्यांच्या डिमॅट खात्यात शेअर्स थेट ट्रान्सफर करून भेट देता येतात. यासाठी डिलीव्हरी सूचनापत्रक भरून द्यावं लागतं. भेट घेणाऱ्या व्यक्तीलाही अशा प्रकारचा एक अर्ज भरून द्यावा लागतो. मात्र शेअर सर्टिफिकेटच्या स्वरूपात शेअर्स असतील तर ट्रान्सफर डीड करून ते कंपनीच्या रजिस्ट्रारकडे पाठवावं लागतं. म्युच्युअल फंडातील गुंतवणूकही ट्रान्सफर करता येते, परंतु ही प्रक्रिया वेगळी आहे. म्युच्युअल फंडधारकाचा मृत्यू झाल्याखेरीज फंड अशा प्रकारे सहज दुसऱ्याच्या नावावर करता येत नाही. शिवाय त्रयस्थाकडून म्युच्युअल फंड पैसेही स्वीकारत नाही. दुसऱ्या व्यक्तीने दिलेल्या चेकच्या सहाय्यानेही म्युच्युअल फंडात गुंतवणूक करता येत नाही. मात्र अल्पवयीन मुलांच्या बाबतीत असा दुसऱ्या व्यक्तीने दिलेला पैसा स्वीकारला जातो. यासाठी दात्याला डिक्लरेशन द्यावं लागतं. त्यात ज्या बँकेतून पैसे जाणार असतात त्याच्या खात्याचे तपशील भरावे लागतात. तसंच अल्पवयीन मुलाशी किंवा मुलीशी असलेलं नातं सांगावं लागतं.

विवाहप्रसंगी रोख रक्कम देण्याऐवजी आरोग्य विमा देणं अधिक चांगलं ठरतं. त्यात वधूच्या आगामी प्रसूतिखर्चासह इतर सर्व वैद्यकीय खर्च येतो. यासाठी सुमारे पाच लाखांच्या कव्हरसाठी सर्वसामान्यपणे तीसच्या आत वय असलेल्या वधूसाठी वार्षिक बारा हजार रुपये हप्ता बसतो. वराला टर्म इन्शुरन्स देणंही योग्य ठरतं. पुढे मागे तो हप्ते भरणार नाही असं वाटलं तर एकाच वेळी सर्व रक्कम भरण्याची सोयही काही योजनांमध्ये असते. अशा प्रकारे आपली करबचत आणि आपल्या प्रियजनांचं भविष्य सुरक्षित करणं असे दोन्ही हेतू भेटी किंवा बक्षिसांमुळे साध्य होतात.

इथून मिळेल चांगला परतावा

एक फेब्रुवारीनंतर शेअर बाजाराच्या निर्देशांकात होत असलेली घसरण अजूनही थांबलेली नाही. अस्थिरतेचा निर्देशांक अजूनही उच्च स्तरावरच आहे. पुढच्या काळातही शेअर बाजारावरचा ताण कमी होण्याचं चिन्हं दिसत नाहीत. या काळात चांगला पोर्टफोलिओ बनवण्यासाठी उत्तम पाया असलेल्या शेअर्सवर लक्ष केंद्रित करायला हवं. येत्या काळात चांगला परतावा मिळण्याची अपेक्षा असणाऱ्या शेअर्सविषयी...

❇ दुचाकी, तीन चाकी वाहनं तसंच इतर वाहनांसाठी इलेक्ट्रॉनिक आणि मॅकेनिकल सुरक्षा प्रणाली पुरवणारी कंपनी म्हणजे मिंडा कॉर्पोरेशन लिमिटेड. कंपनीची जवळपास २० टक्के उत्पादनं अमेरिका, इंग्लंड, युरोप, दक्षिण-पूर्व आशिया तसंच इतर देशांमध्ये निर्यात केली जातात. येत्या काळात वाहन उद्योगाची चलती असेल. याचा लाभ कंपनीला होईल. या कंपनीच्या शेअरसाठी २४६ रूपयांचं उद्दीष्ट ठरवण्यात आलं आहे. या शेअरची सध्याची किंमत १८९ रूपये आहे. त्यानुसार या गुंतवणुकीतून ३० टक्के परतावा मिळू शकतो.

❇ जीआयसी हाउसिंग फायनान्सच्या शेअर्ससाठी ६५५ रूपयांचं उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे. या शेअरची सध्याची किंमत ३९३ रूपये आहे. त्यानुसार ६७ टक्के परतावा मिळू शकतो. ही कंपनी गृहप्रकल्पांसाठी कर्ज देते. कंपनीकडे रोख रकमेची कमतरता नाही. तसंच भविष्यही उज्ज्वल आहे. बांधकाम व्यवसायाला गती मिळणार असल्याने कंपनीला लाभ होऊ शकतो.

शेअर बाजार

❇ कन्साई नेरोलॅक पेंट्सने गेल्या १२ तिमाहींमध्ये नफा कमावला आहे. ही कंपनी सातत्याने नवी उत्पादनं सादर करते. याचा लाभ कंपनीला होतो. त्यातचं कंपनीचं देशभरातलं जाळं मजबूत आहे. या कंपनीच्या शेअर्ससाठी ६०० रूपयांचं उद्दीष्ट आहे. शेअरची सध्याची किंमत ४२७ रूपये आहे. त्यामुळे २१ टक्के नफा मिळवता येईल.

❇ रशिल डेकोर लिमिटेडच्या शेअरसाठी ११७३ रूपयांचं उद्दीष्ट ठरवण्यात आलं आहे. सध्याची किंमत ८३९ रूपये आहे. त्यामुळे यातून ३९ टक्के परताव्याची अपेक्षा करता येईल.

❇ इंडोकाउंट इंडस्ट्रीजच्या शेअरसाठी १४० रूपयांचं उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे. या शेअरची सध्याची किंमत ९२ रूपये आहे. त्यानुसार ५२ टक्के नफा मिळू शकतो.

हे युद्ध कशासाठी?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार युद्धाची सुरूवात केली आहे. यामुळे जगभरातल्या व्यापारवृद्धीला खीळ बसेल अशी भीती व्यक्त होत आहे. स्टील तसंच ॲल्युमिनिअमच्या आयातीवर कर लावण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतला आहे. स्टिलच्या अमेरिकेतल्या आयातीवर २५ टक्के तर ॲल्युमिनिअमच्या आयातीवर १० टक्के कर लावण्यात येणार आहे. अमेरिकेच्या या निर्णयावर जगभरातून नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर युरोपियन युनियन, कॅनडा, ब्राझील, चीन आणि इतर काही देशांनी अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर कर लावण्याचा इशारा दिला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात भारतानेही अनेक उत्पादनांवर कर लादला. या निर्णयाला इतर देशांकडून अजून विरोध झालेला नाही.

अर्थभान

कर लादण्याच्या अशा निर्णयांमुळे व्यापारावर विपरित परिणाम होऊ शकतो. अमेरिकेतल्या स्टिल उद्योगात नोकऱ्या उपलब्ध झाल्या तरी इथल्या स्टिलच्या किंमती वाढलेल्या असतील. बांधकाम क्षेत्रात स्टिलचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या क्षेत्रासाठीचा स्टिल हा अत्यंत महत्त्वाचा कच्चा माल आहे. यामुळे त्या देशातला बांधकामाचा खर्च बराच वाढणार आहे. तसंच अमेरिकेली स्टिलची सगळी उत्पादनं महाग होतील. ॲल्युमिनिअम हासुद्धा विविध क्षेत्रांमध्ये वापरला जाणारा महत्त्वाचा धातू आहे. हा धातू महागल्याचा परिणाम सर्व उद्योगांवर होईल. परिणामी अमेरिकेत महागाईचा दर वाढेल. किंमती वाढल्याने स्टिल आणि ॲल्युमिनिअमच्या उत्पादनांची मागणी कमी होईल. त्यातच पायाभूत सोयीसुविधांच्या निर्मितीत या धातूंचा वापर होत असल्याने या सुविधांचा वापर करणाऱ्यांना अधिक शुल्क भरावं लागेल. याचा परिणाम नोकऱ्यांवरही होईल. प्रत्येक क्षेत्रात बांधकाम गरजेचं असतं. त्यामुळे अमेरिकेतल्या लोकांना नोकऱ्या मिळणार नाहीत. धातूची निर्मिती करणाऱ्या प्रमुख देशांमधल्या नोकऱ्या कमी होतील. यामुळे अमेरिकेतली त्यांची निर्यात घटेल. अशा कर लादण्याचा जगभरातल्या उद्योगावरच दूरगामी परिणाम होईल. त्यामुळे अशा व्यापारी युद्धामुळे कोणाचाही लाभ होणार नाही. या युद्धात कोणीही जिंकू शकणार नाही

यासाठी मिळतं ग्यारंटीमुक्त कर्ज

उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे ग्यारंटीमुक्त कर्ज दिलं जातं. यासोबत शिक्षण, कौशल्य विकास तसंच इतर काही कारणांसाठीही ग्यारंटीमुक्त कर्ज मिळू शकतं. नॅशनल केंद्रिय अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारितल्या क्रेडिट गॅरेंटी ट्रस्टी कंपनीतर्फे अशा कर्जांसाठी गॅरेंटी दिली जाते. याविषयी जाणून घेऊया.

❇ ७.५ लाख रूपयांपर्यंतच्या शैक्षणिक कर्जासाठी ही कंपनी गॅरेंटी देऊशकते. या कर्जासाठी क्रेडिट गॅरेंटी फंड फॉर एज्युकेशन लोनची निर्मिती करण्यात आली आहे. या अंतर्गत दहा लाख लोकांना शिक्षणासाठी ग्यारंटीमुक्त कर्ज देण्याचं उद्दीष्ट आहे.

कर्ज

❇ चांगली नोकरी मिळवण्यासाठी कौशल्य विकास करायचा असेल तर ग्यारंटीमुक्त कर्ज मिळू शकतं. केंद्र सरकारने क्रेडिट गॅरेंटी फंड फॉर स्कील डेव्हलपमेंट लोनची निर्मिती केली आहे. या अंतर्गत वर्षभरात दहा ते २० लाख लोकांना ग्यारंटीमुक्त कर्ज उपलब्ध करून दिलं जातं.

❇ लघुउद्योगासाठी घेतलेलं कर्जही ग्यारंटीमुक्त असतं. या अंतर्गत घेतलेल्या दहा लाख रूपयांपर्यंतच्या कर्जासाठी कोणतीही ग्यारंटी द्यावी लागत नाही.

❇ सरकारच्या स्टँड अप योजनेअंतर्गत महिला तसंच अनुसूचित जाती आणि जमातींचे लोक दहा लाख रूपयांपासून एक कोटी रूपयांपर्यंतचं ग्यारंटीमुक्त कर्ज मिळवू शकतात.

होंडा डब्ल्यूआर-व्ही डिज

होंडाने आपल्या 'डब्ल्यूआर-व्ही'ची विशेष आवृत्ती सादर केली आहे. 'डब्ल्यूआर-व्ही एज' असं या नव्या गाडीचं नाव आहे. या गाडीत सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे. 'मारूती-सुझुकी'च्या 'विटारा'ला टक्कर देण्यासाठी नवी 'डब्ल्यूआर-व्ही' सज्ज झाली आहे. पेट्रोल आणि डिझेल अशा दोन्ही प्रकारांमध्ये ही गाडी उपलब्ध असेल. पेट्रोल गाडीची किंमत ८.०१ लाख रूपये आणि डिझेल गाडीची किंमत ९.१ लाख रूपये ठेवण्यात आली आहे.

ऑटो वर्ल्ड

नव्या एजमध्ये १.२ लिटरचं पेट्रोल तर १.५ लिटरचं पेट्रोल इंजिन बसवण्यात आलं आहे. या दोन्ही इंजिनांमध्ये ५ स्पीड मॅन्युअल ट्रान्समिशन असेल. गाडीच्या इतर वैशिष्ट्यांबद्दल बोलायचं तर यात १६ इंचांचे ५ स्पोक एलॉय व्हिल्स आहेत. या गाडीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यात रिअर पार्किंग सेंसर आहेत. तसंच रिअर व्ह्यू मिररवाला रिअर व्ह्यू कॅमेराही देण्यात आला आहे. यासोबतच होंडाच्या कनेक्ट ॲपची सुविधाही देण्यात आली आहे.

म्युच्युअल फंड

म्युच्युअल फंड विकण्याआधी...

बऱ्यापैकी नफा मिळवल्यानंतर अनेक जण म्युच्युअल फंड विकून टाकतात किंवा दुसऱ्या फंडांमध्ये गुंतवणूक करतात. पण याआधी काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. गुंतवणूकदारांनी म्युच्युअल फंडाच्या कामगिरीकडे विशेष लक्ष द्यायला हवं. म्युच्युअल फंड बाजाराची तुलना करायला हवी. मगच फंड विक्रीचा निर्णय घ्यायला हवा. विशिष्ट उद्देशाने गुंतवणूक केली असेल आणि हे उद्दीष्ट साध्य झालं असेल तर कमी धोक्याच्या गुंतवणुकीकडे वळता येईल. यामुळे शेअरबाजारात घसरण झाली तरी तुमच्या गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होणार नाही. गुंतवणुकीवर वेळेआधी बाहेर पडल्यास लावलं जाणारं शुल्क आाणि गुंतवणुकीच्या परताव्यावरचा कर यांचा विचार करणं गरजेचं आहे. म्युच्युअल फंडाची कामगिरी चांगली होत नाही म्हणून घाईने तो विकण्यात काहीच अर्थ नाही. सारासार विचार करूनच त्याची विक्री करायला हवी.

अर्थनियोजन

गृहिणींनी काय करावं?

गृहिणींनीही आपल्या अर्थनियोजनाकडे विशेष लक्ष द्यायला हवं. गृहिणींना घरखर्चासाठी पतीकडून ठराविक रक्कम मिळते. पण यात तुमच्या गरजेसाठी लागणारी रक्कम नसावी. तुमच्या वैयक्तिक गरजा भागवण्यासाठी लागणारी रक्कम तुम्ही मिळवायला हवी. तुमच्या आरोग्यासाठी आरोग्य विमा खरेदी करण्याबाबत पतीला सांगायला हवं. संपूर्ण कुटुंबासाठी आरोग्यविमा योजना त्यांनी घ्यायला हवी. त्यात तुमचाही समावेश असायला हवा. पतीने जीवनविमा काढला आहे किंवा नाही हे गृहिणींनी जाणून घ्यायला हवं. कोणत्याही वाईट प्रसंगाला सामोरं जाण्याची तयारी तुम्ही करून ठेवायला हवी. पतीच्या संपत्तीत तुमचा वाटा आहे किंवा नाही हे जाणून घ्यायला हवं. आर्थिक व्यवहारांचं गणित समजून घ्यायला हवं. महिला पुरूषांपेक्षा ७ ते ८ वर्षं अधिक जगतात. त्यामुळे तुमच्या निवृत्तीची तजवीज करून ठेवायला हवी. लग्नानंतर तुमची बँक खाती बंद करू नका.

अर्थसल्ला

होता येणार नाही निवृत्त

बंगळूरूमध्ये राहणारे पंकज सूद सीए आहेत. त्यांचं मासिक उत्पन्न दोन लाख रूपये आहे. गृहिणी असलेली पत्नी आणि दोन मुलं असं त्यांचं कुटुंब आहे. ते भाड्याच्या घरात राहतात. पण त्यांनी ५५ लाख रूपये किंमतीचं हक्काचं घर घेतलं आहे. त्यासाठी त्यांनी २० लाख रूपयांचं कर्ज घेतलं आहे. त्याचा ३० हजार रूपये हप्ता ते भरतात. त्यांना ९ हजार रूपये भाडं मिळतं आणि ते २५ हजार रूपये भाडं भरतात. कुटुंबाचा महिन्याचा खर्च ५० हजार रूपये आहे. मुलांच्या शिक्षणासाठी ते २५ हजार रूपये खर्च करतात. विम्याचा हप्ता तसंच इतर गुंतवणूकही ते करतात. यानंतर त्यांच्याकडे १५,१६७ रूपये उतरतात. त्यांची बरीच आर्थिक उद्दीष्ट आहेत. ही उद्दीष्ट साध्य करण्यासाठी त्यांना बरेच प्रयत्न करावे लागणार आहेत. लवकर निवृत्त होणं हा पर्याय ते स्वीकारू शकत नाहीत.

गुंतवणूक

कोणता फंड आहे योग्य?

२०१७ मध्ये बॅलन्स्ड फंडांमधल्या गुंतवणुकीला सर्वाधिक पसंती मिळाली. हे फंड गुंतवणुकीचा लोकप्रिय पर्याय ठरले. शेअर बाजारात पहिल्यांदाच गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारासोबतच नियमित गुंतवणूकदारांनीही बॅलन्स्ड फंडांमध्ये गुंतवणूक केली. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना हे फंड चुकीच्या पद्धतीने विकण्यात आले. त्यांना नियमित उत्पन्नाचं आमिष दाखवण्यात आलं. या फंडांना इक्विटी ओरिएंटेड हायब्रिड फंड असंही म्हटलं जातं. या फंडांमधल्या गुंतवणूकदारांनी २०१८ मध्ये अधिक चौकस असणं गरजेचं आहे. या फंडांमधली ६५ टक्के रक्कम इक्विटीमध्ये गुंतवली जाते. या गुंतवणुकीतून मिळणाऱ्या परताव्यावर दहा टक्के दराने कर लावला जाणार आहे. पहिल्यांदाच गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी हे फंड योग्य ठरतात. हंगामी गुंतवणूकदारांसाठीही हे फंड योग्य मानले जातात. या फंडांचे काही तोटेही आहेत. त्यांच्याकडेही लक्ष द्यायला हवं.



हिंदुस्थान
वलयांकित
बुधवार, दि. २१ मार्च २०१८

रणरागिणी!

भारतीय लष्करात महिलांचा समावेश ही नवीन बाब नसली तरी अलिकडच्या काळापर्यंत प्रत्यक्ष युद्धभूमीवर कर्तृत्व दाखवण्याची संधी त्यांना मिळत नसे. या मर्यादेमुळेच त्यांना युद्धनीती आणि युद्धसामर्थ दाखवण्याची संधी मिळत नव्हती. मात्र मध्यंतरीच भारतीय वायूदलात लढाऊ वैमानिकांचा समावेश करण्यात आला आणि हे क्षेत्रही महिलांसाठी खुलं झालं. सध्या अशा काही रणरागिणी लष्करी क्षेत्र गाजवत आहेत.

भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात मुसंडी मारत आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत त्या महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. लष्करातील त्यांचा सहभाग अत्यंत मोलाचा ठरत आहे. पण असं असलं तरी तरी अगदी अलिकडच्या काळापर्यंत त्यांना प्रत्यक्ष युद्धभूमीवर लढण्याची संधी नव्हती. मात्र मध्यंतरीच ही त्रुटी दूर झाली आणि भारतीय वायूदलाच्या इतिहासात पहिल्यांदा महिला लढाऊ वैमानिकांचा समावेश करण्यात आला. अवनी चतुर्वेदी, मोहना सिंह आणि भावना कांत या महिला भारतीय वायू दलातल्या पहिल्या महिला लढाऊ वैमानिक ठरल्या. अलिकडेच अवनीने एकटीने अतिवेगवान लढाऊ विमानातून प्रवास करुन नवा इतिहास रचला. या तिघींनीही १५० तास विमान चालवलंय. लढाऊ विमानं उडवणारी ती पहिला महिला वैमानिक ठरली आहे. तमाम महिलांसाठी ही अभिमानास्पद बाब म्हटली पाहिजे.

गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये महिला लढाऊ वैमानिकांचा वायूदलात समावेश करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली. महिलांना पाच वर्षांसाठी प्रायोगिक तत्त्वावर ही संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. लढाऊ वैमानिकांच्या पदासाठी एकूण सहा महिलांमध्ये चुरस होती. त्यापैकी तिघींची निवड करण्यात आली. या तिघींमधली अवनी चतुर्वेदी मध्य प्रदेशमधल्या सतनामधली. रेवामधल्या आदर्श शाळेतून तिने प्राथमिक शिक्षण घेतलं. जयपूरमधल्या वनस्थली विद्यापीठातून तिने बी टेकची पदवी मिळवली. प्रशिक्षणादरम्यान तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. पण प्रसंगावधान राखत अवनीने प्रशिक्षणाचा कालावधी यशस्वीपणे पूर्ण केला.

मानिनी

मोहना सिंहचं शिक्षण नवी दिल्लीतल्या एअर फोर्स शाळेत झालं. इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन या विषयात तिने पदवी मिळवली आहे. मोहना राजस्थानमधल्या झुनझुनूची. तिचे वडिलही वायूदलात आहेत. तिचे आजोबाही याच क्षेत्रात होते. घराण्याची देशसेवेची परंपरा कायम राखण्यासाठी आपल्याला सैन्यदलात जायचं होतं, असं मोहना सांगते.

भावना कांत बिहारमधल्या बेगुसराईची. तिने मेडिकल इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदवी मिळवली आहे. या तिघींनी दाखवलेल्या धाडसाचं आणि भारतीय वायूदलात सहभागी होण्यासाठी केलेल्या मेहनतीचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. या लढवय्या महिलांकडून प्रेरणा घेऊन अधिकाधिक महिला वायूदलात सहभागी झाल्या तर आनंदाची बाब म्हणता येईल. देशसेवेसाठी सज्ज असणाऱ्या या महिलांना दिलखुलास शुभेच्छा.

●●●

बचत साधा पार्लरमध्ये

ब्यु

टी पार्लरमध्ये जाणं ही सध्या चैन नसून गरज बनली आहे. नेटनेटकं राहताना सौंदर्योपचार करुन घेण्यासाठी पार्लरमध्ये जावं लागतं. मात्र तिथे गेल्यावर नेमक्या किती रुपयांना कात्री लागेल हे सांगताच येत नाही. इथले तज्ज्ञ सौंदर्यविषयक सल्ला आणि उपचार देण्यात पारंगत असतातच त्याचबरोबर नानाविध प्रसाधनं आणि नको असणाऱ्या सेवा ग्राहकांच्या गळ्यात मारण्यातही ते निष्णात असतात. आपण त्यांच्या बोलण्याने फसतो आणि विनाकारण खर्च करुन येतो. त्यामुळेच ब्युटी पार्लरमध्ये पैसे कसे वाचवायचे हे जाणून घ्यायला हवं.

* पार्लरमध्ये नेमकी कोणती ट्रिटमेंट घ्यायची आहे हे निश्चित ठरवा आणि तेवढीच सेवा घेऊन बाहेर पडा.

* हेअरकट करायचा असेल तर घरीच वॉश घ्या. त्यामुळे हेअरवॉशचे पैसे वाचतील.

* केस कलर करुन घेणार असाल तर बाजारातून कलर घेऊन जा. यामुळे केवळ अप्लिकेशनचे पैसे द्यावे लागतील. त्याचबरोबर केस धुण्यासाठी पार्लरमध्ये थांबू नका. काही पार्लरमध्ये मेंदी अथवा हेअर कलरनंतरच्या हेअर वॉशिंगसाठी वेगळे चार्जेस लावले जातात. ब्लो ड्रायसाठी अतिरिक्त शुल्क आकारतात. त्यामुळे या सेवा घेऊ नका.

* बरेचदा ब्युटी पार्लरमध्ये तुमच्या केसांच्या, त्वचेच्या काही तक्रारी वाजवीपेक्षा अधिक गंभीर असल्याचं भासवून महागडे उपचार करुन घेण्यास भरीस घातलं जातं. मात्र याला बळी पडू नका. इथेही सेकंड ओपिनियन घेण्यास हरकत नाही.

* ब्युटी पार्लर बदलण्यास, नव्या पार्लरमध्ये जाण्यास संकोच बाळगू नका. कदाचित यामुळे तुम्हाला कमी रकमेत जास्त चांगली सेवा मिळू शकेल.

* सध्या ब्युटी ट्रिटमेंट्सची होम सर्व्हिस देणाऱ्या काही व्यक्ती आणि संस्था समोर येत आहेत. हे तज्ज्ञ घरी येऊन सेवा देतात. फेशियल, वॅक्सिंग, ब्लीचिंग, थ्रेडिंग, मेनिक्युअर, पेडिक्युअर, हेअर स्टायलिंग, ड्रेपिंग, मेक अप आदी नानाविध सुविधा घरीच मिळत असल्याने जाणं-येणं वाचतं शिवाय त्यांनाही सेटअपवर खर्च करावा लागत नसल्याने कमी रकमेत सेवा देणं शक्य होतं. त्यांच्या सेवा कमी किमतीत उपलब्ध होऊ शकतात.

* काही पार्लरमध्ये आपल्या नियमित ग्राहकांसाठी लॉयल कस्टमर रिवॉर्ड, डिस्काऊंट अथवा एकत्रित सेवांचं पॅकेज देतात त्यांचा लाभ घेतला तर पैसे वाचू शकतात.

●●●

मुलांना वळण लावताना...

पॅरेंटिंग

संगोपनाची जबाबदारी पार पाडताना नेमकं कसं वागावं, शिस्तीचे नेमके कोणते निकष पाळावे हे अनेक पालकांना समजत नाही. मुलांचं हळवं मन जपत त्यांना वळण लावणं हे एक दिव्यं असतं. म्हणूनच या कामी तज्ज्ञांची मदत घेणं इष्ट ठरतं. हे जाणकार लोक मुलांना पुरेशी मोकळीक देण्याबाबत आग्रही असतात. त्यांच्यावर सतत आपली मतं लादत राहणं, त्यांच्या मतांची कदर न करणं आणि धाकदपटशा दाखवून आपल्या मनाप्रमाणे वागवणं म्हणजे योग्य संगोपन नाही असं ते सांगतात. मुलांचं म्हणणं नीट ऐकून घेतलं पाहिजे आणि नंतर त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली पाहिजे. अनेकदा मुलांकडून एखादी वस्तू हरवते आणि त्यामुळे पालकांकडून ओरडून घ्यावं लागतं किंवा मार खावा लागतो. त्याऐवजी त्याला असं नेमकं का झालं हे विचारावं. वारंवार वस्तू गहाळ होत असतील तर कदाचित कोणी त्यांच्याकडून वस्तू काढून घेत असेल किंवा चोरत असेल. याचीही शहानिशा करावी. मुलांकडून बेजबाबदारपणा होत असेल तर नीट समजावून सांगावं. अलीकडेच लंडनमध्ये घडलेली गोष्ट. कंपास बॉक्स हरवल्यामुळे आपल्या तापट आईचा मार खावा लागण्याच्या भीतीनं जीव तोडून पळणाऱ्या मुलानं मागचापुढचा विचार न करता गच्चीवरून उडी मारली. मुलाचा जीव गेलाच परंतु आईला जन्माची अद्दल घडली. म्हणूनच मुलांशी वागताना ९० टक्के प्रेम आणि १० टक्के धाक हवा. मारहाण, आरडाओरडा, शिवीगाळ यामुळे मुलांना कधीच वळण लागत नाही. मात्र प्रेमानं, समजुतीनं सांगितलं तर ती सगळं ऐकतात. ती नक्कीच सुधारतात.



●●●

डोळेही बोलू लागतील

ब्युटी टॉक

डोळ्यांना अधिक सुंदर भासवण्यासाठी मेक अपची मोलाची साथ मिळते. अर्थात त्यासाठी हा मेक अप तेवढ्याच योग्य रितीने करायला हवा. यात झालेली एखादी छोटी चूकही विचका करु शकते हे लक्षात घ्यावं. आतापर्यंत ब्लॅक पेन्सिल लायनर हा मेक अपचा एक निकष होता. परंतु दमट वातावरणात हा लायनर वितळल्याचं दिसतं. त्यामुळे वरच्या पापणीजवळ स्मज साचतो. अगदी वॉटरप्रूफ आयलायनरही टिकत नाही. विशेषतः उन्हाळ्यात हे अधिक घडतं. यासाठी पावडर शॅडोचा वापर करा. हे तेलकट नसल्यामुळे बराच काळ टिकतं. त्यापासून स्मज निर्माण झाला तरी पटकन दिसून येत नाही. लिक्विड लायनरकडे नेहमीच दुर्लक्ष केलं जातं. कारण ते लावणं कठीण असतं. मात्र हे लायनर लावण्यास शिकल्यास त्याच्यासारखं स्वच्छ, सुरेख रेषा काढता येण्याजोगा आणि स्मज निर्माण न करणारं लायनर नाही. आयलायनर लावण्यातही एक मेख असते. ती म्हणजे तुमचं आयलायनर आयशॅडोशी सुसंगत ठेवा. आयशॅडोतील पावडर पिग्मेंट्स आयलायनरमधील तेलकट पिग्मेंट्सना लॉक करतात. यासाठी छोटासा ब्रश वापरा. प्रायमरचा वापर केला तर त्वचेत सलगता दिसतेच; शिवाय मेक अपसाठी एक छान बेस तयार होतो आणि तो स्मजिंगलाही प्रतिबंध करतो. त्यामुळे पापण्यांवर प्रायमरचा वापर करून डोळ्यांचा मेक अप करा. शक्यतो पार्टीसाठी चमकता मेक अप करून त्वचेला उठाव आणा. ब्रॉंझ किंवा गोल्ड रंगाची आयशॅडो वापरा. यामुळे घाम आला तरी डोळ्यांच्या मेक अपला बाधा येणार नाही.

●●●

टाळावा शब्दांचा आघात

बंध जपताना...

बरेचदा दुसऱ्याला दुखावण्याची आपली इच्छा नसते. पण बोलण्याच्या ओघात, अगदी नकळत असे काही शब्द तोंडून निघतात ज्याबद्दल नंतर पश्चाताप होतो. ते शब्द दुसऱ्याला घायाळ करतात. नेहाकडूनही सासूबाईंना असाच एक चुकीचा शब्द गेला. अर्थात नंतर तिने 'सॉरी' म्हणण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्यातील नात्याला तडा जायचा तो गेलाच. असे अनेक प्रसंग वारंवार घडत असतात. नातेसंबंधात तणाव येण्याला वादावादीचे प्रसंग, संघर्षाच्या वेळी बोललं गेलेलं एखादं वाक्य किंवा शब्द कारणीभूत ठरतात. अगदी पती-पत्नीच्या नात्यातही हीच गोष्ट दिसून येते. बोलताना नकळत जोडीदाराच्या वर्मावर बोट ठेवलं गेलं तर तो दुखावला जातो, अबोल बनतो किंवा अकारण आक्रस्ताळेपणा करून राग व्यक्त करतो. यामागचं नेमकं कारण न लक्षात आल्यानं मग घरातील ताण वाढत जातो. म्हणून शब्दांचा नेमका आणि विचारपूर्वक, किमान वापर अनेकदा नाती टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त असतो. मग ती नाती कौटुंबिक असोत, व्यावसायिक असोत वा सामाजिक. अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगी तोल सुटणंही स्वाभाविक असतं. परंतु मग जाणीवपूर्वक नाती सांधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे वर दिलेल्या नेहाच्या प्रसंगात नंतर तिने सासुबाईंची मागी मागितली असती, मुलाला शिकवण्यावरुन हा वाद झाल्यानंतर त्याला त्यांच्यापुढे शिकण्यासाठी बसवलं असतं तर परिस्थिती निवळली असती. शेवटी दरी सांधणं महत्त्वाचं, दुसरं काय!

●●●

त्वचेवर येईल टवटवी

स्किन केअर

त्वचेचं संवर्धन ही वाटते तेवढी सोपी बाब नाही. विशेषत: उन्हाळ्यात त्वचेची अधिक काळजी घ्यावी लागते. या दिवसात त्वचा टॅन होते. यामुळे हरवलेली चमक पुन्हा मिळवण्यासाठी घरच्या घरी फेशियल करता येईल. यासाठी चार चमचे शुद्ध मोती पावडर, दोन चमचे शुद्ध पर्ल क्रीम, कच्चं दूध आणि गुलाबपाणी व दोन छोटे चमचे काकडीचा रस यांची गरज असते. त्वचा कोरडी असेल तर ऑलिव्ह ऑईल घ्या. याशिवाय प्रत्येकी एकेक मोठा चमचा फ्रेश क्रीम, मध, अंडे, लिंबाचा रस यांची गरज असते. कापसाच्या बोळ्यावर कच्चं दूध घेऊन चेहरा पुसून घ्या. त्यानंतर पर्ल पावडर आणि गुलाबपाणी एकत्र करून स्क्रब करा. त्वचा कोरडी असेल तर थोडं खोबरेल तेल मिसळा. १० मिनिटं स्क्रब करून हळूवारपणे धुऊन टाका आणि पर्ल क्रीम लावा. १०-१५ मिनिटांनी फ्रेश क्रीम, अंडं, लिंबाचा रस, मध आणि दोन मोठे चमचे पर्ल पावडर यांचं मिश्रण लावा. मिश्रण सुकल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा आणि काकडीचा रस व गुलाबपाणी यांचं मिश्रण लावून २० मिनिटांनी चेहरा धुवून टाका.

ट्रेंडी मोनोक्रोम कॉम्बिनेशन

वेळोवेळी फॅशनविश्वात बदल घडत असतात. जुन्यांच्या जागी काही नवे ट्रेंड्स प्रस्थापित होत असतात. याच धर्तीवर सध्या मोनोक्रोम कॉम्बिनेशनची चलती दिसून येते. सर्वसाधारणपणे ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटांच्या काळात हा लूक लोकप्रिय होता. परंतु आताच्या जमान्यात पुन्हा ही फॅशन सर्वांची लाडकी बनली आहे. मोनोक्रोम कॉम्बिनेशन म्हणजे ब्लॅक अँड व्हाईट कॉम्बिनेशन. पांढऱ्या आणि काळ्या रंगाच्या विविध रंगसंगतींमधून वेगवेगळ्या प्रकारची कॉम्बिनेशन्स तयार होतात. त्यांच्यामुळे एकाच वेळी साधेपणा आणि फॅशन या दोन्ही बाबी साधता येतात. त्यामुळे दैनंदिन कार्यालयीन वापरापासून पार्टीपर्यंत या कॉम्बिनेशनचा आवर्जून वापर केला जात आहे. बहुतेक सेलिब्रिटीजच्या मते रंगीत कपड्यांच्या दुनियेत मोनोक्रोम ट्रेंडमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळाच उठाव येतो. कुठल्याही प्रकारच्या इंडियन, वेस्टर्न किंवा इंडो वेस्टर्न कॉम्बिनेशनमध्येही मोनोक्रोमचा वापर उठून दिसतो. पांढरा सलवार-कुर्ता आणि काळी ओढणी किंवा काळा सलवार कुर्ता आणि पांढरी ओढणी हे कॉम्बिनेशन छान दिसतं. काही वेळा पांढऱ्या कुर्त्यावर काळं डिझाईन असेल तर त्यावर काळी सलवार आणि ओढणीही शोभून दिसते. याखेरीज जीन्स आणि टी शर्टमध्ये मोनोक्रोमचा सर्रास वापर केला जात आहे.

स्टाईल स्टेटमेंट

साडी आणि ब्लाऊजसाठीही हे कॉम्बिनेशन लोकप्रिय झालं आहे. या कॉम्बिनेशनवर कोणत्याही प्रकारच्या ॲक्सेसरीज छान दिसतात. त्या रंगीत असल्या तर सगळ्या एकाच रंगाच्या वापरा. म्हणजे पांढऱ्या टॉपवर गुलाबी डिझाईन असेल, तर तुम्ही पांढऱ्या किंवा काळ्या किंवा गुलाबी रंगाच्या ॲक्सेसरीज वापरू शकता. घड्याळाचा काळा बेल्टही याच्याशी सुसंगत ठरतो. शिवाय सध्या विविध फॅशन्समध्ये, वेलवेट, कॉटन, टेरीकॉट आणि सिल्क मटेरियलमध्ये आणि लो कटपासून क्लोज्ड नेकपर्यंतच्या सर्व प्रकारांमध्ये पांढऱ्या आणि काळ्या रंगाचे असंख्य टॉप्स उपलब्ध आहेत.

●●●

सजावट ओठांची

जाडसर दिसतील ओठ

सध्याच्या पाऊटच्या जमान्यात सगळ्यांनाच अँजलिना जोली किंवा प्रियांका चोप्रासारखे मोठे ओठ हवे असतात. सर्जरी न करताही काही मेक अप ट्रिक्सच्या साह्याने हा लूक मिळवता येतो. * ओठांवर कन्सिलर लावा आणि ते लिप लाईनपर्यंत पसरवा. यामुळे ओठ मोठे, भरीव दिसण्यास मदत होईल.* ओठांबाहेरच्या डीप कटला क्यूपिड बो म्हणतात. लिप लायनरच्या साह्याने क्यूपिड बो हायलाईट केल्यास ओठ जाडसर दिसण्यास मदत होते. *ओठ जाड दिसण्यासाठी न्यूड शेड्सना प्राधान्य द्या. लाईट कलर किंवा पीच शेड्समधील लिपस्टीपमुळे किंवा दोन न्यूड शेड्स एकाच वेळी शेडिंग करुन लावल्याने ओठ जाड दिसण्यास मदत होते. डार्क शेड्समुळे ओठ बारीक दिसतात. * ओठ जाडसर भासवण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर उपयुक्त ठरतो. बाहेरच्या आऊटलाईनपर्यंत ग्लॉस पसरवल्यास ओठांचं सौंदर्य खुलतं.



●●●

निगा त्वचेची

राखा पायांची स्वच्छता

तळपाय, गुडघे, घोटे, टाचा या पायांच्या काळ्या पडणाऱ्या भागांची स्वच्छता करण्यासाठी कामी येणारा एक घटक म्हणजे बेकिंग सोडा. क्षारीय गुणधर्मांमुळे त्वचेच्या स्वच्छतेसाठी याचा मोलाचा उपयोग होतो. तळपायांवर बेकिंग सोड्याने स्क्रब केल्यास अथवा बेकिंग सोड्याची पेस्ट तळपायावर लावल्यास टॅनिंग, पादत्राणांचे व्रण, काळसर डाग निघून जातात आणि त्वचा मऊमुलायम होते. बेकिंग सोड्यामुळे मृत त्वचा दूर होते. सहाजिकच त्वचेतील अशुद्ध तत्त्वं नाहिशी झाल्यामुळे त्वचा कोमल आणि तेजस्वी होते. बेकिंग सोडा, ओटमील आणि खोबरेल तेल ही सामग्री सम प्रमाणात एकत्र करुन तयार होणारी पेस्ट भेगाळलेल्या टाचांवर लावा. दहा मिनिटांनंतर ब्रशने स्क्रब करुन पाय धुवा. या उपायाने टाचांच्या भेगा कमी होतात, टाचा मऊ-मुलायम आणि गुलाबीसर दिसतात. या लेपाने पायांची दुर्गंधीही नाहिशी होते.

●●●

घ्या काळजी

ब्लो ड्रायर वापरा पण...

केस घनदाट भासवण्यासाठी ब्लो ड्रायरचा वापर केला जातो. मात्र यावेळी काळजी घ्यायला हवी. कधीही ओल्या केसांवर ब्लो ड्रायर वापरु नये. ब्लो ड्राय करताना केस ८० टक्के सुकलेले असावेत. ब्लो ड्राय करण्याआधी हिट प्रोटेक्शन क्रीमचा वापर करणं गरजेचं ठरतं. ही काळजी घेतली नाही तर उष्णतेमुळे केसांचंच नव्हे तर स्काल्पचंही नुकसान होऊ शकतं. यामुळे केस गळण्याची समस्या उद्भवू शकते. चुकीच्या दिशेने केस ब्लो ड्राय केले तर अधिक फ्रिझी आणि प्रमाणाबाहेर कोरडे होतात. केस मऊसर राहण्यासाठी ब्लो ड्रायर नेहमी खालच्या दिशेने ठेवायला हवा. ब्लो ड्रायरमध्ये तीन वेगवेगळ्या तापमानाचं सेटिंग दिलेलं असतं. कूल, लो आणि हार्ड अशी ती तीन सेटिंग असतात. केस पातळ असतील तर सेटिंग लो मोडवर असावं. केस दाट अथवा राठ असतील तरी हार्ड सेटिंग वापरु नये. केसांचे छोटे-छोटे भाग करुन ब्लो ड्रायर केल्यास अधिक चांगले परिणाम बघायला मिळतात.

●●●

रसगंधा

होममेड स्वीस रोल

ध्या केकप्रेमींची संख्या वाढते आहे. मुलांबरोबरच मोठेही आवडीने केक खातात. स्वीस रोल हा असाच सर्वांचा आवडता प्रकार... तर मग असा डिलिशिअस क्रीम रोल तुम्ही घरीदेखील बनवू शकाल.

साहित्य: एक अंडं, अर्धा चमचा मीठ, एक वाटी कॅस्टर शुगर, चमचाभर व्हॅनिला इसेन्स, फिलिंगसाठी कॅरटोन क्रीम, विप्ड क्रीम, दीड वाटी स्ट्रॉबेरीचे बारीक तुकडे, डस्टिंगसाठी आयसिंग शुगर इत्यादी.

कृती: सर्वप्रथम ओव्हन २०० डिग्री सेल्सिअस तापमानावर सेट करुन घ्या. स्विस रोल टिनला ग्रीसप्रूफ पेपर लावून घ्या. आता एका बाऊलमध्ये अंड्याचा पांढरा बलक घेऊन त्यात मीठ घाला आणि मिश्रण भरपूर फेटून घ्या. नंतर त्यात साखर घालून फेटा. यामुळे ते दाट आणि चमकदार होईल. आता त्यात अंड्यांचा पिवळा बलक मिसळून चांगलं फेटून घ्या. त्यानंतर इसेन्स मिसळा. या मिश्रणात हळूहळू मैदा मिसळा आणि दुसरीकडे चमच्याने मिश्रण ढवळत रहा. अशा प्रकारे तयार मिश्रण ट्रेमध्ये ओतून बेक करुन घ्या. केक तयार झाल्यावर कॅस्टर शुगर लावलेल्या ग्रीसप्रूफ पेपरवर काढून घ्या. केक थंड झाल्यानंतर त्यावर विप्ड क्रीम, कॅरटोन क्रीम आणि स्ट्रॉबेरीचे बारीक तुकडे पसरा. क्रीमचा थर जाड असेल याची खात्री करा. आता दोन्ही कडा हलक्या हाताने धरुन केक रोल करा. सर्वात शेवटी रोलवर आईसिंग शुगर भुरभुरा. तुमचा स्वीस रोल तयार आहे. आता स्लाईस करुन सर्व्ह करा. आवडत असेल तर तुम्ही या रोलमध्ये फ्रूट जॅम, लेमन कर्ड, चॉकलेट स्प्रेड आदींचा वापर करु शकता. या एका स्वीस रोलमधून तुम्हाला १९८ कॅलरीज, १२ ग्रॅम फॅट्स, चार ग्रॅम प्रोटीन, १८ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स, १२ ग्रॅम शर्करा आणि १४ ग्रॅम डाएटरी फायबर मिळेल.

●●●

हिंदुस्थान

वलयांकित

बुधवार, दि. २१ मार्च २०१८

आव्हान 'हिचकी'चं

उलटा 'देवदास'

दमदार मानधन!

सिध्दार्थ इज सिंगल



रणवीरचा अभिनय नाही चांगला

प्रवास विनम्र भावल्या

वरुण-कॅट एकत्र थिरकणार